सकाळ



गडहिंग्लज : रवळनाथ सोसायटी व ज्ञानदीप प्रबोधिनीतर्फे झालेल्या कार्यक्रमात बोलताना एम. एल. चौगुले. व्यासपीठावर डॉ. दत्ता पाटील, एस. एस. तेरणी, डॉ. आर. एस. निळपणकर.

# 'रवळनाथ-ज्ञानदीप'तर्फे आरोग्यविषयक कार्यक्रम

गडहिंग्लज, ता. १७ : येथील रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी व ज्ञानदीप प्रबोधिनीतर्फे आरोग्यविषयक कार्यक्रम झाला. संस्थेचे अध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते. एस. एस. तेरणी यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वातंत्र्य दिनानिमित्त हा कार्यक्रम झाला.

चौगुले यांनी आरोग्याची गुरुकिल्ली या विषयावर मार्गदर्शन केले. तेरणी यांनी आरोग्य संवर्धन या विषयावर मार्गदर्शन केले. प्रबोधिनीचे सचिव ॲड. संदीप कागवाडे यांनी आरोग्य संपन्नतेसाठी योगासने या विषयावर मार्गदर्शन केले.

प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष डॉ. दत्ता पाटील यांनी स्वागत केले. संचालक डॉ. आर. एस. निळपणकर, डॉ. एम. पी. पाटील, प्रदीप अभ्यंकर, नंदकुमार शेळके, प्रा. जे. बी. केसरकर, प्रा. महावीर मरजे, रशिदा शेख, चंद्रकांत पत्की, महेश मजती, प्रा. विजय आरबोळे, डॉ. प्रभाकर द्राक्षे, संभाजी साठे, विठ्ठल मोरे, नंदकुमार मोरे, रेखा पोतदार, शिवानंद घुगरे आदी उपस्थित होते. झेप ॲकॅडमीच्या प्राचार्या मीना रिंगणे यांनी सूत्रसंचालन केले.

कीर्तिवंत

18 August 2020- page-4

# नियमित व्यायाम हीच आरोग्याची गुरूकिल्ली : एम. एल. चौगुले

## श्री रवळनाथ, ज्ञानदीप प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्याची गुरूकिल्ली विषयावरील व्याख्यान संपन्न

**गडहिंग्लज (प्रतिनिधी) :**

दररोज चालणे, पोहणे, लवकर उठणे आणि नियमित व्यायाम हीच आरोग्याची गुरूकिल्ली आहे, असे प्रतिपादन श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटी व ज्ञानदीप प्रबोधनीचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी केले.

७४ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त श्री रवळनाथ आणि ज्ञानदीप प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्याची गुरूकिल्ली या विषयावरील व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यावेळी एस. एस. तेरणी यांचे आरोग्य संवर्धन या विषयी व्याख्यान झाले. ज्ञानदीप प्रबोधिनीचे सचिव अ‍ॅड. संदीप कागवाडे यांनी आरोग्य संपन्नतेसाठी योगासने या विषयावर




**गडहिंग्लज : येथे अयोजित कार्यक्रमात बोलताना एम. एल. चौगुले.**

प्रात्याक्षिकासह मार्गदर्शन केले. ज्ञानदीप प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. दत्ता पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. झेप अ‍ॅकडमीच्या प्राचार्या सौ. मिना रिंगणे यांनी सूत्रसंचालन केले. अ‍ॅड. संदीप कागवाडे यांनी आभार मानले.

यावेळी संस्थापक संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, संचालक प्रा. डॉ. एम. पी. पाटील, प्रदीप अभ्यंकर, चार्टर्ड अकौंटंट नंदकुमार शेळके, गडहिंग्लज शाखेचे चेअरमन प्रा. जे. बी. केसरकर, शाखा सल्लागार प्रा. महावीर मरजे, श्रीमती रशिदा शेख, चंद्रकांत पत्की, ज्ञानदीप प्रबोधिनीचे खजिनदार महेश मजती तसेच प्रा. विजय आरबोळे, प्रा. डॉ. प्रभाकर द्राक्षे, संभाजी साठे, विठ्ठल मोरे, नंदकुमार मोरे, सौ. रेखा पोतदार, रवळनाथचे व्यवस्थापक शिवानंद घुगरे यासह अधिकारी, शाखाधिकारी, कर्मचारी, हितचिंतक, सभासद उपस्थित होते.